| तात्याराम आण्णा नाझीरकर<br>विरुध्द<br>अर्जुन आण्णा नाझीरकर व इतर |
|---|

## नि. दि. दावा क्र.३०३/२०२५ मधील निशाणी क्र. ०५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या आदेशाकरीता दाखल केला आहे आणि त्यानुसार विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.१६ खाली म्हणणे दाखल केले आणि अर्जाला जोरदार विरोध केला तसेच अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. तसेच वादींनी दाखल केलेल्या मा. उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचे अवलोकन केले.

४. दोन्ही पक्षाच्या विद्वान विधीज्ञांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांनी अर्ज आणि म्हणण्यानुसार युक्तीवाद केला आणि त्यानुसार प्रार्थनाही केली.

५. वादी व प्रतिवादी क्र.१ यांची कथने पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांचे निष्कर्ष त्यावरील कारणमिंमासेसह खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय? | .....नकारार्थी |
| २) | वादीने न्यायाचा तौल त्याच्या बाजूने आहे हे सिध्द केले आहे काय? | .....नकारार्थी |
| ३) | वादीने अर्ज नामंजूर केल्यास न भरुन येणारे नुकसान | .....नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | वादीस होणार आहे हे सिध्द केले आहे काय? | |
| ४) | अंतिम आदेश? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत –</u>**

६. तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा आदेश देताना तीन घटकांची पुर्तता करावी लागते. ते घटक म्हणजे अ. प्रथमदर्शनी केस, ब. न्यायाचा समतोल आणि क. कधीही भरून न येणारे नुकसान.

७. हे मुद्दे किंवा वरील तीन घटक एकमेकांशी निगडीत आहेत, म्हणून तथ्ये आणि कागदपत्रांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी चर्चा आणि कारणांसाठी हे सर्व मुद्दे एकत्र घेतले आहेत.

८. वादीने त्याच्या अर्जामध्ये तहसिलदार, फलटण यांच्याकडील प्रकरण क्र.रस्ता/संसा/००७७/२०२५ वरील दिनांक १५/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये दावा कलम १ मधील वादीच्या वहिवाटीस प्रतिवादी यांनी स्वत: अगर एजंट अथवा त्रयस्थ इसम यांच्यामार्फत कोणताही हरकत अडथळा करू नये व अनाधिकाराने रस्ता करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी क्र.१ यांना देण्यात यावी अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१ याने त्याचे निशाणी क्र.१६ कडील म्हणण्यामध्ये त्यांनी वादीस हरकत अडथळा केल्याचे नाकारले आहे. वादीने त्याचे अर्जात असे कथन केले आहे की, उत्तर बाजुकडील रस्ता हा प्रतिवादी क्र. १ याने मोडलेला असून ऊसाचे पिक करून गट नं.१७६ च्या मधोमध रस्ता आहे असे खोटे भासवून वादीच्या वहिवाटीचे क्षेत्रातून रस्ता मागत आहे. प्रतिवादी क्र.१ ने

गट नं.१७६ च्या मधोमध रस्ता अस्तित्वात असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही तरीही तहसिलदार, फलटण यांनी अनाधिकाराने आदेश पारीत केला आहे. तहसिलदार, फलटण यांचा दि. १५.१०.२०२५ रोजीचा आदेश बेकायदेशीर आहे. सदर आदेशान्वये प्रतिवादी क्र.१ याने रस्ता काढण्यास सुरूवात केल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१ ने त्याचे म्हणण्यामध्ये वादीची कथने नाकारली आहेत.

९. वादीने निशाणी क्र.३ खाली दाखल केलेल्या तहसिलदार, फलटण याचे दि.१५.१०.२०२५ रोजीचे आदेशाचे अवलोकन केले असता तहसिलदार, फलटण यांनी अर्जदार म्हणजेच सध्याचे प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज मंजूर केला असून त्यामध्ये त्यामधील अर्जदार याचे गट क्र.१७६/३ जाणाऱ्या पारंपारीक वहिवाटीच्या रस्त्यास प्रतिवादींनी म्हणजेच या दाव्यातील वादींनी गट नं. १७६/४ मध्ये निर्माण केलेला अडथळा १५ दिवसाचे आत स्वखर्चाने दूर करावा व वादीच्या या रस्त्यास शांततामय व कायदेशीर वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करू नये अशी निरंतर ताकीद दिली आहे. तहसिलदार, फलटण यांनी स्थळपंचनामा करून सर्व कागदपत्रांचे अवलोकन करून निकालपत्र दिलेले आहे. त्यामुळे तहसिलदार फलटण यांचे निकालपत्र योग्य आहे. तहसिलदार, फलटण यांनी त्यांच्या या निकालपत्रामध्ये या दाव्यातील वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचा गट क्र. १७३/३ मध्ये प्रतिवादी क्र.१ च्या गटात वहिवाटीचा पारंपारीक रस्ता होता आणि त्या रस्त्यास प्रतिवादीने म्हणजेच या दाव्यातील वादीने ऊस तसेच नारळ लावून हरकत अडथळा केल्याचे स्पष्ट होते असे निरीक्षण नोंदविले आहे. तसेच वादीचे कथन असे आहे की, गट नं.१७६ चे उत्तर बांधावरून प्रतिवादी क्र.१ यांना रस्ता आहे परंतू, तहसिलदार, फलटण यांचे स्थळपाहणीत असा रस्ता त्यांना दिसून आला नाही. वादीने गट नं.१७६ चे उत्तर बाजूस प्रतिवादी क्र.१ यांना रस्ता असल्याचे

सिध्द केले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी वादीच्या दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा केल्याचे प्रथमदर्शनी शाबीत होत नाही. त्यामुळे वादीला प्रथमदर्शनी केस दिसून येत नाही. तसेच न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने नाही. तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

१०. जर हा अर्ज फेटाळला गेला तर वादीचे कोणतेही न भरून येणारे नुकसान होणार नाही. म्हणून वादीच्या विद्वान विधीज्ञांनी मांडलेला युक्तीवाद कायद्याने योग्य नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ बाबत –**

११. मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी आल्यामुळे मी मुद्दा क्र.४ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

(आदेश खुल्या न्यायालयात सांगून घोषीत.)

Sd/-

फलटण. ( जि. ना. जाधव )
दिनांक :– २६.११.२०२५ तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर
फलटण.